<u>प्रेसनोट</u> दि.२०/०५/२०१९

<u>दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर.</u>

**“लहान मुलीस पळविणारा एक वर्ष फरार असणारा आरोपी पोलीसांच्या ताब्यात”**

“जनता वसाहत मधील मजुरी करणाऱ्या कुटुंबातील अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमीष दाखवुन पळवुन नेणाऱ्या इसमाला दत्तवाडी पोलीसांनी अटक केले आहे.”

जनता वसाहतमध्ये रोजच्या-रोज मजुरी करुन पोट भरणाऱ्या कुटूंबातील अल्पवयीन मुलीला त्या परीसरात राहणाऱ्या एका तरुणाने प्रेमाचे आमीष दाखवुन एक वर्षापुर्वी पळवुन नेले त्याबाबत तीच्या आई-वडीलांनी अज्ञात इसमा विरुध्द अपहरणाची तक्रार दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे नोंदविली होती. त्याचा तपास सहा.पोलीस निरीक्षक बाजीराव पाटील हे करत होते. नक्की आपल्या मुलीला कोणी पळवुन नेले आहे हे पालकांना माहिती नव्हते त्यामुळे मुलगी शोधुन काढणे हे पोलीसांसमोर मोठे आव्हान होते. दत्तवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांनी या अल्पवयीन मुलीचा तपास आत्यंत गांभीर्याने घेवुन विविध तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी यांची वेगवेगळी पथके तयार करुन जनता वसाहत मधील प्रत्येक गल्लीमध्ये माहिती काढण्यास सांगितली परंतु जनता वसाहतमध्ये राहणाऱ्या कोणीही निघुन गेले नसल्याचे दिसुन आले. यामध्ये अधिक सखोल चौकशी केल्यावर असे दिसुन आले की, उमेश भिवा वारीसे,वय-२८ वर्षे, रा. शिडवणे,ता.कणकवली,जि-सिंधुदुर्ग हा काही दिवसापुर्वी डेक्कन येथे नाष्ट्याची गाडी चालवणाऱ्या व जनता वसाहतमध्ये राहणाऱ्या एका छोट्या व्यवसायीकाकडे रोजंदारीवर काम करत होता व त्यांचे घरीच राहत होता. तेथे या दोघांची ओळख झाली असल्याचे पोलीसांना समजले. त्याप्रमाणे त्याचे मुळगावी जावुन त्याला ताब्यात घेण्यात आले आहे व आज रोजी अटक करुन न्यायालयात हजर केला असता त्यास २३ मे पर्यंत पोलीस कस्टडी मंजुर करण्यात आली आहे.

या कारवाईमध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक, देविदास घेवारे यांचे नेतृत्वाखाली बाजीराव पाटील सहा. पोलीस निरीक्षक, महिला पोलीस उप निरीक्षक हजारे व पोलीस कॉन्स्टेबल नवनाथ भोसले, पोलीस कॉन्स्टेबल शिवाजी शिंदे यांनी सहभाग घेतला आहे.

**(देविदास घेवारे)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पोलीस स्टेशनपुणे शहर